K.T.S.P.Mandal's

# Hutatma Rajguru Mahavidyalaya

Rajgurunagar, Tal-Khed, Dist-Pune

2025-26

Report

| | |
|---|---|
| The title of the event | Marathon competition |
| Organizing Department | Department of Physical Education & Sports |
| The name of the organizer/coordinator | Dr.Pratima Lonari |
| Dated | 29th Aug 2025 |
| Venue | Khed old ghat |
| Expenditure | 7,485/- |
| Number of participants | 100 |
| Target group | College students |
| Introduction | Marathon competition was organized on the occasion of National Sports day and Martyr Rajguru jayanti in the college on 29th Aug 2025. |
| The objectives of the program | The main objective of this program is to keep the body and health of the students healthy. |

( Dr.Pratima Lonari )
Director of Phy Edn.
H. R. Mahavidyalaya
Rajgurunagar,Pune.

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
RAJGURU NAGAR

Dr. Shirish S. Pingale
Principal
Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar,Tal.Khed,Dist.Pune.

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
RAJGURU NAGAR





HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
RAJGURU NAGAR

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
01 Sep 2025 - Page 4

# राजगुरू महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**किरण खुडे**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिन व हुतात्मा राजगुरू जयंतीचे औचित्य साधून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वरिष्ठ व कनिष्ठ गटातील स्पर्धेत १९५ विद्यार्थी स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्‌घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, चांडोली ग्रामीण रुग्णालयाचे डॉ.वाघमारे, डॉ. कांबळे , प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांसाठी पाच कि.मी. तर विद्यार्थिनींसाठी तीन कि.मी. अशी स्पर्धा झाली. वरिष्ठ गटात मुलांमध्ये राहुल पारधी, संकेत भोईर, गौरव लोखंडे यांचा तर मुलींमध्ये सिद्धी कोहिनकर, समृद्धी दरवडे, पूर्वा कोतवाल यांचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आला. तर कनिष्ठ गटात मुलांमध्ये तनिष भोकसे, गौतम चौधरी, ऋषिकेश भोकसे यांनी तर मुलींमध्ये श्रावणी लंगोटे, अंकिता मंडलिक, दिव्या सुतार यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. विजयी खेळाडूंचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेच्या निमित्ताने उपस्थित प्रमुख अतिथी, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी स्वतःला व आपल्या कुटुंबाला तंदुरुस्त ठेवण्याची शपथ घेतली.

संचालक हिरामण सातकर यांनी मनोगतात विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक दृष्ट्या तंदुरुस्त राहून स्वतःला सिद्ध करण्याचे आवाहन केले. या स्पर्धेचे आयोजन डॉ. प्रतिमा लोणारी, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते, प्रा.मोनाली काळे यांनी केले.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक तर आभार प्रा. सारिका गोरे यांनी मानले.

पुढारी

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धा

**खेड :** राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय आणि साहेबराव बुट्टे पाटील महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. २९) मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पुणे-नाशिक महामार्गावरील जुन्या खेड घाटात आयोजित करण्यात आलेल्या या शर्यतीत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयासह जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

स्पर्धेचा प्रारंभ खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष हिरामण सातकर आणि संचालक बाळासाहेब सांडभोर यांच्याहस्ते झाला.



**हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी धावपटू.**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, प्रा. डॉ. संजय शिंदे, डॉ. पायल ओसवाल, गणेश आहेरकर यांच्यासह महाविद्यालयातील क्रीडाशिक्षक डॉ. प्रतिमा लोणारी, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते, प्रा.मोनाली काळे यांनी संयोजन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, सूत्रसंचालन प्रा.मच्छिंद्र मुळूक तर आभार प्रा. सारिका गोरे यांनी मानले.

विजेते पुढीलप्रमाणे : वरिष्ठ गटात मुलांमध्ये राहुल पारधी, संकेत भोईर, गौरव लोखंडे यांचा तर मुलींमध्ये सिद्धी कोहिनकर, समृद्धी दरवडे, पूर्वा कोतवाल यांचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आला. तर कनिष्ठ गटात मुलांमध्ये तनिष भोकसे, गौतम चौधरी, ऋषिकेश भोकसे यांनी तर मुलींमध्ये श्रावणी लंगोटे, अंकिता मंडलिक, दिव्या सुतार यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला.

My Pune Gramin Edition
Aug 30, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
RAJGURU NAGAR

खे . ता . शि . प्र . मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरूनगर, पुणे ४१०५०५

## सूचना

दिनांक : ५/८/२०२५

वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, आपले महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ करिता "हुतात्मा शिवराम हरी राजगुरू" यांची जयंती व राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करणार आहे. सदर मिनी मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिना-या विद्यार्थ्यांनी त्यांची नाव नोंदणी महाविद्यालयातील क्रीडा विभागात २५ ऑगस्ट २०२५ पर्यंत सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत येऊन करावी.

(डॉ.प्रतिमा लोणारी)
शा.शि.संचालिका
Director of Phy. Edn.
H. R. Mahavidyalaya
Rajgurunagar,Pune.

(डॉ.एस.एस.पिंगळे)
प्राचार्य
Principal
Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar, Tal. Khed,
Dist. Pune. 410 505.